• वर्ष : ०३ • अंक : २७६ • पुणे • शनिवार, दि. २७ जून २०२६ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक





## थोडक्यात पण महत्वाचे



### खडकवासला ग्रामीण भाजपच्या वतीने 'आणीबाणी काळा दिवस' कार्यक्रम

पुणे (आरंभ पर्व) : खडकवासला ग्रामीण भाजपचे अध्यक्ष नवनाथ तागुंदे यांच्या नेतृत्वाखाली डोणजे येथे 'आणीबाणी काळा दिवस' कार्यक्रम आयोजित करण्यात आला. २५ जून १९७५ रोजी लागू करण्यात आलेल्या आणीबाणीच्या निषेधार्थ आयोजित या कार्यक्रमात लोकशाही रक्षकांच्या योगदानाचे स्मरण करण्यात आले. यावेळी दिव्यांग विकास आघाडीचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष बाजीराव पारगे, दत्ताभाऊ पायगुडे, राजाराम भामे, शिवाजी लायगुडे, संतोष वरपे यांच्यासह खडकवासला ग्रामीण भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात आणीबाणीच्या काळातील घटनांना उजाळा देत लोकशाही, संविधान आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच देशातील लोकशाही मूल्यांचे संरक्षण करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने सजग राहण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन खडकवासला ग्रामीण भाजपच्या वतीने करण्यात आले.



### राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्काराने प्रवीण बागडे यांचा गौरव

पुणे (आरंभ पर्व) : निळे प्रतिक बहुउद्देशीय सेवाभावी संस्था आयोजित राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार-२०२६ सोहळा तसेच दैनिक निळे प्रतिकच्या १७ व्या वर्धापन दिन आणि राजर्षी शाहू महाराज जयंती निमित्त आयोजित भव्य कार्यक्रमात ज्येष्ठ लेखक, कवी व सामाजिक विश्लेषक प्रवीण बागडे (नागपूर) यांना राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र सभागृह, छत्रपती संभाजीनगर येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या सोहळ्यात बुद्धिस्ट उद्योजक गोल्डमॅन रोहित पिसाळ यांच्या हस्ते प्रवीण बागडे यांना पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र तसेच राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. उपस्थित मान्यवरांच्या टाळ्यांच्या गजरात त्यांचा गौरव करण्यात आला. पत्रकारिता, साहित्य, सामाजिक प्रबोधन, संविधानिक मूल्यांचा प्रचार-प्रसार तसेच समाजहितासाठी सातत्याने केलेल्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेऊन प्रवीण बागडे यांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. याप्रसंगी ज्येष्ठ साहित्यिक प्रभाकर सोमकुवर, सामाजिक कार्यकर्त्या ज्योती सिंगारे यांच्यासह विविध क्षेत्रांतील एकूण २० मान्यवरांचा गौरव करून त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन आयु. रतनकुमार साळवे, मुख्य संपादक, दैनिक निळे प्रतीक यांनी केले होते. कार्यक्रमाला विविध क्षेत्रांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, साहित्यिक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडल्याबद्दल आयोजकांचे सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात आले.

### हिरो मोटोकॉर्पकडून ऑल-न्यू पॅशन+ डिस्क लाँच



पुणे (आरंभ पर्व) : हिरो मोटोकॉर्प या जगातील मोटरसायकल आणि स्कूटरच्या सर्वात मोठ्या उत्पादक कंपनीने आज ऑल-न्यू पॅशन+ डिस्कच्या लाँचची घोषणा केली. हे स्टायलिश आणि वैशिष्ट्यांनी समृद्ध असलेले नवीन व्हेरिएंट आहे, जे रोजचा प्रवास करणाऱ्या राइडर्सना आधुनिक गतिशीलतेचे पर्याय उपलब्ध करून देण्याप्रती कंपनीच्या कटिबद्धतेला अधिक दृढ करते. शहरी भागातील प्रवास आणि दैनंदिन उपयुक्तता लक्षात घेऊन डिझाइन केलेल्या या मोटरसायकलमध्ये कामगिरी, इंधन कार्यक्षमता आणि सोयीस्करता यांचे उत्तम संयोजन आहे, ज्यामुळे नवीन पिढीच्या राइडर्ससाठी ही मोटरसायकल उत्तम पर्याय ठरते.

# अयोध्या अपहार; आठ अटकेत

## श्रीराम मंदिर न्यास सरचिटणीस चंपत राय यांचा राजीनामा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

अयोध्येतील श्रीराम मंदिरात भाविकांकडून अर्पण केल्या जाणाऱ्या देणग्या आणि मौल्यवान वस्तूंच्या अपहारप्रकरणी उत्तर प्रदेश पोलिसांनी शुक्रवारी आठ जणांना अटक केली. या गैरव्यवहाराची नैतिक जबाबदारी स्वीकारत श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाचे सरचिटणीस चंपत राय आणि सदस्य विश्वस्त अनिल मिश्रा यांनी शुक्रवारी राजीनामा दिला. त्यामुळे या घोटाळ्याची व्याप्ती वाढली असून त्याबद्दल विरोधकांनी सत्ताधारी भाजप सरकारला लक्ष्य केले आहे.



भाविकांसाठी २०२४ मध्ये खुल्या झालेल्या श्रीराम मंदिराच्या उभारणीसाठी २०२० पासून श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाची स्थापना करण्यात आली होती. त्याचे संस्थापक सरचिटणीस म्हणून चंपत राय यांची सुरुवातीपासूनच मंदिर उभारणी आणि देणगी व्यवहारांच्या हाताळणीत महत्त्वाची भूमिका राहिली आहे. त्यांच्या राजीनाम्यामुळे न्यासाबद्दलही प्रश्न उपस्थित होऊ लागले आहे. देणगी अपहारप्रकरणी शुक्रवारी अटक करण्यात आलेल्यांमध्ये राय यांचा माजी वाहनचालक रामशंकर यादव ऊर्फ टिन्नू याचा समावेश आहे. याखेरीज भाविक निवास केंद्रातील देणगी मोजणी व्यवस्थेचा प्रमुख सुभाष श्रीवास्तव आणि देणग्या मोजणाऱ्या अन्य सहा जणांचा अटक आरोपींमध्ये समावेश आहे. त्यांना अयोध्येतील न्यायालयाने २९ जूनपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. श्रीवास्तवचा अपवाद (पान ९ वर) अयोध्या अपहार; आठ अटकेत (पान १ वरून)वगळता अन्य आरोपींकडून आतापर्यंत ७९.५० लाख रुपयांची रोकड जप्त करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले.

श्रीराम मंदिरातील देणगी गैरव्यवहारप्रकरणी 'श्री राम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासा'चे सदस्य कृष्ण मोहन यांच्या तक्रारीवरून एफआयआर दाखल करण्यात आला. या आरोपांची चौकशी करण्यासाठी उत्तर प्रदेश सरकारने स्थापन केलेल्या विशेष तपास पथकाच्या प्राथमिक अहवालातील शिफारशींनंतर एफआयआरमध्ये नावे असलेल्या आठ जणांना अटक करण्यात आली, अशी माहिती अयोध्याचे वरिष्ठ पोलीस अधीक्षक गौरव ग्रोव्हर यांनी दिली. आठही आरोपी मंदिराला मिळालेली रोख रक्कम आणि मौल्यवान वस्तू मोजण्याच्या प्रक्रियेत सहभागी होते. यापैकी काही जण सरकारी नोकरीतील असून काही भारतीय स्टेट बँकेचे कर्मचारी असल्याचे पोलिसांनी सांगितले.

राम मंदिराला मिळालेल्या देणग्यांच्या कथित गैरव्यवहाराचा वाद ७ जून रोजी समोर आला. तसेच देणग्यांची मोजणी करणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून रोकड आणि मौल्यवान वस्तू लंपास केल्या जात असल्याचेही उघड झाले. त्यानंतर 'श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासा'च्या तक्रारीवरून आणि समाजवादी पक्षाचे अयोध्येचे माजी आमदार पवन पांडे यांनी केलेल्या आरोपानंतर उत्तर प्रदेश सरकारने १३ जून रोजी विशेष तपास पथक स्थापन केले होते आणि या पथकाने २३ जून रोजी सरकारला आपला प्राथमिक अहवाल सादर केला. येत्या १५ दिवसांन या पथकाचा अंतिम अहवाल सरकारकडे सादर होण्याची शक्यता आहे. मात्र, या अपहाराच्या पार्श्वभूमीवर श्रीराम मंदिर न्यासाकडे जमा झालेल्या देणग्या आणि मौल्यवान वस्तूंचा आजवरचा तपशील सादर करण्याची मागणी विरोधी पक्षांकडून केली जात आहे.

### आरोपी कोण?

देणगी हिशोब कर्मचारी : सुभाष श्रीवास्तव, अविनाश शुक्ला, अनुकल्प मिश्रा, लवकुश मिश्रा, मनीष कुमार यादव, करुणेश पांडे, रामाशंकर मिश्रा आणि रामशंकर यादव ऊर्फ टिन्नू. त्यांच्यावर 'भारतीय न्याय संहिता'च्या कलम ३०६ (मालकाच्या ताब्यात असलेली मालमत्ता लिपिक किंवा नोकराद्वारे चोरणे), ३१६ (गुन्हेगारी स्वरूपाचा विश्वासाघात), ३१७ (चोरीची मालमत्ता अप्रामाणिकपणे स्वीकारणे) आणि ६१ (गुन्हेगारी कट) तसेच इतर तरतुदींनुसार गुन्हे दाखल.

## ३९ वर्षीय रुग्णामध्ये दुर्मिळ आनुवंशिक विकाराचे निदान

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

एका वर्षात दोन वेळा गंभीर न्यूमोनियाचा सामना करावा लागलेल्या ३९ वर्षीय व्यक्तीमध्ये दुर्मिळ आनुवंशिक प्रतिकारशक्ती विकाराचे निदान करण्यात मणिपाल हॉस्पिटल, बाणेर येथील डॉक्टरांना यश आले. त्यामुळे वारंवार होणाऱ्या संसर्गामागील दडलेले कारण उघडकीस आले. सदर रुग्णाला वारंवार श्वसनमार्गाच्या संसर्गाचा त्रास होत होता. मात्र त्याला मधुमेह अथवा प्रतिकारशक्ती कमी होण्यास कारणीभूत ठरू शकणारा अन्य कोणताही ज्ञात आजार नव्हता. न्यूमोनियावरील उपचार यशस्वीरीत्या पूर्ण झाल्यानंतरही आजाराची पुनरावृत्ती होत असल्याने डॉक्टरांनी यामागील कारण शोधण्यासाठी अधिक तपासण्या करण्याचा निर्णय घेतला. प्राथमिक रक्त तपासणीत शरीराला संसर्गांपासून संरक्षण देणाऱ्या इम्युनोग्लोब्युलिन एम (IgM) आणि इम्युनोग्लोब्युलिन



ए (IgA) या दोन महत्त्वाच्या प्रतिपिंडांचे प्रमाण अपेक्षेपेक्षा कमी असल्याचे आढळून आले. मात्र ही कमतरता नेमकी का निर्माण झाली आहे, हे स्पष्ट होत नव्हते.

याबाबत माहिती देताना मणिपाल हॉस्पिटल, बाणेर, पुणे येथील पल्मोनोलॉजी विभागाचे प्रमुख व सल्लागार डॉ. नागेश धाडगे म्हणाले, "कोणतेही स्पष्ट जोखीम घटक नसताना अल्पावधीत दोन वेळा न्यूमोनिया होणे ही बाब चिंताजनक होती. त्यामुळे रुग्णाच्या प्रतिकारशक्तीवर परिणाम करणारे एखादे मूळ कारण असण्याची शक्यता आम्हाला वाटली. यासाठी आम्ही होल एक्सोम सिक्वेन्सिंग (WES) ही प्रगत आनुवंशिक तपासणी करण्याचा सल्ला दिला.

# नऱ्हे मनपा शाळेत वर्गमंत्रिमंडळ निवडणूक

- विद्यार्थ्यांनी घेतला लोकशाहीचा प्रत्यक्ष धडा

**धायरी (दै. आरंभ पर्व)**

लोकशाही केवळ पुस्तकापुरती मर्यादित न राहता तिचा प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थ्यांना मिळावा, या उद्देशाने पुणे महानगरपालिका शिक्षण विभागाच्या नऱ्हे शाळेत गुरुवारी (दि. २५) वर्गमंत्रिमंडळ निवडणूक उत्साहात पार पडली. तब्बल ८०० हून अधिक विद्यार्थ्यांनी या प्रक्रियेत सहभाग घेत मतदानाचा अधिकार बजावत लोकशाहीचा प्रत्यक्ष धडा गिरविला.



> विद्यार्थीकेंद्रित अशा उपक्रमांमधून लोकशाही मूल्ये, मतदानाविषयी जागरूकता, नेतृत्वगुण, जबाबदारीची भावना आणि सामाजिक बांधिलकी विकसित होते. भावी सुजाण आणि जबाबदार नागरिक घडविण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.
> **- वसुंधरा बारवे, उपायुक्त, पुणे महानगरपालिका शिक्षण विभाग**

निवडणुकीत उमेदवारी अर्ज दाखल करणे, प्रचार करणे, मतदार यादी तयार करणे, गुप्त मतदान, मतमोजणी आणि निकाल जाहीर करणे या सर्व टप्प्यांचे वास्तव निवडणुकीच्या धर्तीवर नियोजन करण्यात आले. त्यामुळे विद्यार्थ्यांना लोकशाही व्यवस्थेची कार्यपद्धती, मतदानाचा अधिकार व कर्तव्य तसेच सुजाण नागरिक म्हणून असलेल्या जबाबदाऱ्यांची प्रत्यक्ष ओळख झाली.

मुख्याध्यापक अंकुश माने यांनी भारतीय लोकशाहीची ताकद, संविधानाने दिलेला मतदानाचा अधिकार आणि प्रत्येक मताचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले. शिक्षक संघरत्न लोणे, दिपाली भुसारी, जयश्री नाईकनवरे, सतीश मस्के आणि शिवाजी सरडे यांनी निवडणूक प्रक्रियेतील प्रत्येक टप्प्याची माहिती देत प्रामाणिकपणा, पारदर्शकता, शिस्त आणि नेतृत्वगुणांचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले.

निवडून आलेल्या वर्गमंत्र्यांकडे वर्गातील शिस्त, स्वच्छता, विद्यार्थ्यांच्या समस्या शिक्षकांपर्यंत पोहोचविणे, पर्यावरण संवर्धन तसेच क्रीडा, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांमध्ये नेतृत्व करण्याची जबाबदारी सोपविण्यात येणार आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वक्षमता, निर्णयक्षमता, संघभावना आणि सामाजिक उत्तरदायित्व विकसित होण्यास मदत होणार असल्याचे शिक्षकांनी सांगितले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार अनुभवाधारित शिक्षणाला चालना देणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांना सक्रिय आणि जबाबदार नागरिक म्हणून घडविण्यास उपयुक्त ठरत असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. उपक्रमास पुणे महानगरपालिका शिक्षण विभागाच्या उपायुक्त वसुंधरा बारवे, प्रशासकीय अधिकारी सुनंदा वाखारे, क्रीडा विभाग प्रमुख माणिक देवकर, सहाय्यक प्रशासकीय अधिकारी सुरेश उचाळे, भूषण बहिरमे, क्रीडा अधिकारी सचिन वाडकर आणि पर्यवेक्षिका नंदा डोळस यांनी भेट देऊन कौतुक केले.

## नागरी समस्यांवर ॲड. प्रसन्नदादा जगताप यांची नागरिकांसोबत बैठक

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

प्रभाग क्रमांक २८ मधील हिंगणे खुर्द, विठ्ठलवाडी आणि आनंद विहार परिसरातील नागरिकांच्या विविध नागरी समस्यांवर तोडगा काढण्यासाठी माजी उपमहापौर,नगरसेवक ॲड. प्रसन्नदादा जगताप यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेली महत्त्वपूर्ण नागरिक बैठक उत्साहात पार पडली.

बैठकीत परिसरातील आरोग्य व स्वच्छतेशी संबंधित प्रश्न, रस्त्यांची नियमित साफसफाई होत नसल्याची समस्या, कचरा वेळेवर न उचलला जाणे तसेच इतर मूलभूत नागरी सुविधांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.



उपस्थित नागरिकांनी आपल्या परिसरातील अडचणी, सूचना आणि अपेक्षा मांडत प्रशासनाने तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली.

यावेळी ॲड. प्रसन्नदादा जगताप यांनी नागरिकांनी मांडलेल्या प्रत्येक समस्येची दखल घेत संबंधित विभागांकडे पाठपुरावा करून त्या लवकरात लवकर मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे आश्वासन दिले.

नागरी समस्यांचे कायमस्वरूपी निराकरण करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

या बैठकीमुळे नागरिक आणि लोकप्रतिनिधी यांच्यात थेट संवाद साधला गेला असून परिसरातील प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी सकारात्मक पाऊल उचलण्यात आल्याची भावना उपस्थित नागरिकांनी व्यक्त केली.

## राज्यसेवा मुख्य परीक्षेतून वैकल्पिक, ऐच्छिक विषय वगळले जाणार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राज्यसेवा मुख्य परीक्षेतून वैकल्पिक, ऐच्छिक विषय वगळण्याचा निर्णय महाराष्ट्र लोकसेवा आयोग अर्थात 'एमपीएससी'ने घेतला आहे. त्यामुळे यापुढे उमेदवारांना वैकल्पिक विषयाचे दोन पेपर द्यावे लागणार नाहीत. या बदलामुळे राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२५ ऐवजी १५२५ गुणांची होईल. विशेष म्हणजे या निर्णयाची अंमलबजावणी २०२७ च्या राज्यसेवा मुख्य परीक्षेपासून केली जाणार आहे, अशी माहिती एमपीएससीच्या परीक्षा नियंत्रक व सहसचिव सरिता बांदेकर-देशमुख यांनी परिपत्रकाद्वारे दिली आहे. एमपीएससीने २४ जून २०२२ रोजी जाहीर केल्यानुसार सद्य:स्थितीत महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित, गट-अ व गट-ब अंतर्गत राज्य सेवा मुख्य परीक्षेच्या परीक्षा योजनेनुसार उमेदवारांना वैकल्पिक विषयाचे दोन पेपर अनिवार्य आहेत. देशातील तामिळनाडू, तेलंगणा, मध्य प्रदेश, गुजरात, राजस्थान, पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश, बिहार आदी राज्यांतील लोकसेवा आयोगांनी त्यांच्या राज्य सेवा मुख्य परीक्षा पद्धतीमधून वैकल्पिक, ऐच्छिक विषय वगळून त्याऐवजी अधिक एकसमान आणि प्रमाणित मूल्यमापन पद्धतीचा अवलंब केला आहे.

# सारथी ही सामाजिक परिवर्तन, शैक्षणिक प्रगती आणि युवा सक्षमीकरणाची प्रभावी चळवळ

## सामाजिक न्याय दिनानिमित्त गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव; सारथीच्या योजनांसाठी निधीची कमतरता भासू देणार नाही – उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजितदादा पवार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

उरुळी कांचन (प्रतिनिधी): छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) ही केवळ शासकीय योजना राबविणारी संस्था नसून सामाजिक परिवर्तन, शैक्षणिक प्रगती आणि युवा सक्षमीकरणाची प्रभावी चळवळ आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाच्या विचारांना प्रत्यक्ष कृतीत उतरविण्याचे कार्य सारथी करत असून, तळागाळातील विद्यार्थ्यांना शिक्षण, कौशल्य आणि स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून मुख्य प्रवाहात आणण्याचे मोठे काम संस्थेने केले आहे, असे गौरवोद्गार उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजितदादा पवार यांनी काढले.



राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त साजऱ्या करण्यात आलेल्या सामाजिक न्याय दिनानिमित्त आयोजित गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभात त्या बोलत होत्या. यावेळी विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार म्हणाल्या की, गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान हा केवळ त्यांच्या वैयक्तिक यशाचा गौरव नसून महाराष्ट्राच्या उज्ज्वल भवितव्याचा उत्सव आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून जिद्द, चिकाटी, गुणवत्ता आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी समाजासाठी आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या यशामागे पालकांचा त्याग, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि सारथी संस्थेची भक्कम साथ असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

त्या पुढे म्हणाल्या की, शिक्षण, संशोधन, कौशल्य विकास, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, व्यक्तिमत्त्व विकास आणि उद्योजकता या सर्व क्षेत्रांत सारथीने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. संस्थेच्या उभारणीपासून तिच्या विस्तारापर्यंत दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे मोठे योगदान राहिले असून, त्यांच्या दूरदृष्टीमुळे हजारो विद्यार्थ्यांसाठी संधीची नवी दालने खुली झाली आहेत. सारथीच्या प्रशासकीय मुख्यालयासह राज्यातील आठ विभागीय कार्यालये उभारण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबविण्यात येत असून, प्रत्येक विभागीय केंद्रात ५०० विद्यार्थी आणि ५०० विद्यार्थिनींसाठी अत्याधुनिक वसतिगृह उभारण्यात येणार आहे. या संपूर्ण प्रकल्पासाठी १ हजार ३६० कोटी रुपयांची मंजुरी देण्यात आली असून, ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांसाठी ही सुविधा अत्यंत लाभदायक ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले.

स्पर्धा परीक्षांच्या क्षेत्रात सारथीने उल्लेखनीय यश मिळविले आहे. संस्थेच्या मार्गदर्शनातून आतापर्यंत १४० विद्यार्थी केंद्रीय लोकसेवा आयोग (यूपीएससी) परीक्षेत तर १ हजार २४५ विद्यार्थी महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) परीक्षेत यशस्वी झाले आहेत. तसेच विविध शासकीय सेवांमध्ये हजारो युवक-युवती कार्यरत असून, ही केवळ आकडेवारी नसून समाजाच्या आत्मविश्वासाचे आणि परिवर्तनाचे प्रतीक असल्याचे त्यांनी नमूद केले.

ग्रामीण भागातील युवकांना आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या छत्रपती संभाजी महाराज व्यक्तिमत्त्व व संगणक कौशल्य विकास कार्यक्रमामुळे हजारो विद्यार्थ्यांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. डिजिटल कौशल्य, व्यक्तिमत्त्व विकास आणि रोजगारक्षम प्रशिक्षणामुळे ग्रामीण युवकांना नवीन दिशा मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. याशिवाय विविध शिष्यवृत्ती, प्रशिक्षण आणि मार्गदर्शन योजनाही प्रभावीपणे राबविण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली.

राज्य शासन विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना पंख देण्यासाठी कटिबद्ध असून, सारथीच्या कोणत्याही योजनेला निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही, अशी ठाम ग्वाही उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी दिली. शिक्षण आणि कौशल्य विकासाच्या माध्यमातून सक्षम, आत्मनिर्भर आणि स्पर्धात्मक युवा पिढी घडविण्यासाठी शासन सातत्याने प्रयत्नशील असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**शेवटी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्या म्हणाल्या की, आजचा सत्कार हा प्रवासाचा शेवट नसून नव्या जबाबदारीची सुरुवात आहे. भविष्यात प्रशासनात किंवा कोणत्याही क्षेत्रात कार्य करताना सामान्य नागरिकाला केंद्रस्थानी ठेवून सेवा करावी. तसेच सारथीच्या माध्यमातून मिळालेल्या संधींचे ऋण मानत भविष्यात गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात द्यावा. समाजासाठी योगदान देणारी आणि सामाजिक न्यायाची मूल्ये जपणारी नवी पिढी घडविणे हीच खरी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना अभिवादन ठरेल, असे आवाहन त्यांनी केले.**

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
शनिवार, दि. २७ जून २०२६





## थोडक्यात पण महत्वाचे



## सिंहगड रोड येथे आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

पुणे (आरंभ पर्व) : सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयाचे अध्यक्ष,नगरसेवक सचिन मोरे यांच्या आयोजनातून सनसिटी, सिंहगड रोड येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. मा. ना. चंद्रकांत दादा पाटील, समर्थ युवा फाउंडेशन तसेच मा. श्री. राजेशजी पांडे यांच्या संयुक्त विद्यमाने हा जनहिताचा उपक्रम राबविण्यात आला. शिबिराचे उद्घाटन खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे आमदार भिमराव तापकीर यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. यावेळी विविध मान्यवरांची उपस्थिती लाभली. यावेळी बोलताना आमदार तापकीर म्हणाले, "सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा सहज उपलब्ध व्हावी, हा अशा उपक्रमांचा मुख्य उद्देश आहे. समाजाच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी अशा शिबिरांची नितांत गरज आहे."या शिबिरामध्ये मोठ्या संख्येने नागरिकांनी सहभाग घेत विविध आरोग्य तपासण्यांचा लाभ घेतला. नागरिकांच्या आरोग्याबाबत जनजागृती व्हावी आणि सर्वसामान्यांना दर्जेदार आरोग्य सेवा सहज उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यापुढेही नागरिकांच्या आरोग्य, कल्याण आणि जनहितासाठी अशा विविध उपक्रमांचे सातत्याने आयोजन करण्यात येईल, अशी माहिती आयोजक तथा सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयाचे अध्यक्ष सचिन मोरे यांनी दिली.

## नऱ्हेगाव मानाजी नगर मंजूर १२ मीटर सार्वजनिक रस्ता १६ वर्षांनंतरही बंद

- नागरिकांचा आंदोलनाचा इशारा

पुणे (आरंभ पर्व) : नऱ्हेगाव, मानाजी नगर (ता. हवेली) येथील सर्व्हे क्रमांक ४२ मधील मंजूर १२ मीटर सार्वजनिक रस्ता गेल्या सुमारे १६ वर्षांपासून प्रत्यक्षात खुला झालेला नसल्याने परिसरातील हजारो नागरिकांना वाहतूक, दैनंदिन वहिवाट, आपत्कालीन सेवा आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने गंभीर अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचा आरोप "आपल्या हक्काचा रस्ता संघर्ष समिती"ने केला आहे. समितीच्या म्हणण्यानुसार, तहसीलदार, जिल्हाधिकारी, नगररचना विभाग आणि इतर संबंधित प्राधिकरणांनी वेळोवेळी केलेल्या पंचनामे, नोटिसा आणि अहवालांमध्ये मंजूर रस्त्याबाबत उल्लंघनांची नोंद करण्यात आली आहे. तसेच मूळ जमीनमालकांनी ९ जानेवारी २०१३ रोजी दिलेल्या हमीपत्रात मंजूर रस्त्याखालील जागा संबंधित प्राधिकरणाच्या ताब्यात देण्याची तयारी दर्शविली होती. संबंधित विकासकांनीही लेखी निवेदनात सदर रस्ता सार्वजनिक असल्याचे नमूद केले असल्याचा दावा समितीने केला आहे. तरीदेखील आजपर्यंत रस्ता खुला करण्यात आलेला नसल्याबद्दल नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. विविध शासकीय नोंदी उपलब्ध असतानाही प्रभावी कार्यवाही होत नसल्याने गेल्या १६ वर्षांपासून नागरिकांना त्रास सहन करावा लागत असल्याचे समितीचे म्हणणे आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तातडीने निश्चित कालमर्यादेत रस्ता खुला करण्याबाबत निर्णय घ्यावा, अन्यथा पुणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर संविधानिक, शांततामय आणि लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा "आपल्या हक्काचा रस्ता संघर्ष समितीच्या वतीने देण्यात आला आहे.

## नव्या मालिकेतील दोन दूरध्वनी संचांच्या विक्रीला प्रारंभ




मुंबई (आरंभ पर्व) : कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित दूरध्वनी संच निर्मिती करणाऱ्या 'एआय प्लस' कंपनीने आपल्या नव्या 'नोव्हा २' मालिकेतील नोव्हा २ प्रो आणि नोव्हा २ निओ या दोन दूरध्वनी संचांच्या विक्रीला शुक्रवार (२६ जून)पासून प्रारंभ केला आहे. प्रथमच दूरध्वनी संच वापरणाऱ्या ग्राहकांपासून ते अधिक क्षमतेचा अनुभव घेऊ इच्छिणाऱ्या वापरकर्त्यांपर्यंत सर्वांच्या गरजा लक्षात घेऊन हे संच तयार करण्यात आले आहेत. हे दोन्ही संच शुक्रवारपासून दुपारी बारा वाजल्यापासून 'फ्लिपकार्ट' आणि निवडक विक्री केंद्रांवर उपलब्ध झाले आहेत.



## शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

राजगुरूनगर -किरण खुडे (दै. आरंभ पर्व)

- माजी विद्यार्थ्यांचा उपक्रम

वाफगाव (ता. खेड) येथील महाराजा यशवंतराव होळकर विद्यालयातील विद्यार्थ्यांना माजी विद्यार्थ्यांच्या वतीने शालेय साहित्य व वह्या वाटप करण्यात आले. यावेळी शालेय विद्यार्थी, शिक्षक व माजी विद्यार्थी उपस्थित होते. आपण समाजाचे देणे लागतो या हेतूने तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये या उद्देशाने वाफगाव येथील माजी विद्यार्थ्यांनी शालेय साहित्य व वह्या वाटप हा उपक्रम राबविला. हा स्तुत्य उपक्रम विद्यालयातील व वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी दर वर्षी राबविण्यात येत असल्याचे माजी विद्यार्थी व उपक्रमाचे संयोजक पांडुरंग थिटे यांनी सांगितले. गावातील माजी विद्यार्थी शाळेच्या भौतिक सुविधा व विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देत असल्याने विद्यार्थ्यांनी त्याचा फायदा घेऊन शिक्षण घ्यावे, असे आवाहन मुख्याध्यापक एन. एन. डोके यांनी केले. या प्रसंगी वरुडे गावचे माजी सरपंच व माजी विद्यार्थी मारुती थिटे , माजी उपसरपंच नंदकुमार सुर्वे, खेड तालुका पत्रकार संघाचे उपाध्यक्ष ईसाक मुलाणी, पांडुरंग थिटे, संतोष घोंगाणे, राजेंद्र कंगणे, रमेश रणपिसे, संजय खुरपे या माजी विद्यार्थ्यांच्या हस्ते शालेय साहित्य व वह्या वाटप करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक एन.एन.डोके ,पी.बी.गोडे, इम्रान मुलाणी, दत्तात्रय पाचपुते, सारिका मोहरे, अमृता सोनार, विजय सांडभोर आदी शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

## मोठेपणा पदात नाही माणुसकीत असतो

- अक्षयदादा इंगळे – प्रत्येकाला आपला वाटणारे व्यक्तिमत्त्व!
- मा. उपसरपंच अक्षयदादा इंगळे वाढदिवस अभिष्टचिंतन



• शब्दांकन •
निलेश विलास लांडगे (Director Intech Engineering)
8668420300

(दै. आरंभ पर्व)

**काही व्यक्तींची ओळख त्यांच्या पदामुळे किंवा संपत्तीमुळे होत नाही, तर त्यांच्या स्वभावामुळे आणि माणुसकीमुळे होते. अशीच एक जिव्हाळ्याची, सर्वांना आपली वाटणारी व्यक्ती म्हणजे नऱ्हे गावचे माजी उपसरपंच श्री. अक्षयदादा सुभाष इंगळे.**

शेतकरी कुटुंबात जन्मलेले अक्षयदादा यांनी आपल्या डोळ्यांसमोर नऱ्हे गावाचा बदलता चेहरा पाहिला. एकेकाळी शेतीप्रधान असलेला परिसर आज शिक्षण, उद्योग आणि विकासाचे केंद्र बनला. काळ बदलला, परिस्थिती बदलली आणि त्यांच्या कुटुंबाची आर्थिक प्रगतीही झाली. गाडी, बंगला, व्यवसाय आणि संपन्नता त्यांच्या आयुष्यात आली; पण एक गोष्ट मात्र कधीच बदलली नाही ती म्हणजे त्यांचा साधेपणा, नम्रता आणि माणसांवरील प्रेम.

आजही अक्षयदादा प्रत्येकाशी तितक्याच प्रेमाने, आपुलकीने आणि जिव्हाळ्याने वागतात. समोरची व्यक्ती श्रीमंत असो किंवा गरीब, मोठ्या पदावर असो किंवा सर्वसामान्य त्यांच्या वागणुकीत कधीच भेदभाव दिसत नाही. प्रत्येकाच्या सुख-दुःखात मोठ्या भावाप्रमाणे ते खंबीरपणे उभे राहतात. कोणाच्या आरोग्याची समस्या असो, आर्थिक अडचण असो किंवा कौटुंबिक संकट अक्षयदादांचा मदतीचा हात नेहमी पुढे असतो. सामाजिक कार्य हे त्यांच्यासाठी प्रसिद्धीचे साधन नाही, तर जीवनाचे ध्येय आहे. कोणत्याही स्वार्थाशिवाय, अपेक्षेशिवाय आणि प्रसिद्धीच्या मोहापासून दूर राहून ते समाजासाठी सातत्याने कार्य करत आहेत. शांत, संयमी आणि समंजस स्वभावामुळे त्यांनी असंख्य माणसे जोडली आहेत. त्यांच्या मुला-मुलींच्या वसतिगृहात महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून विद्यार्थी शिक्षणासाठी येतात. त्या प्रत्येक विद्यार्थ्याकडे ते केवळ विद्यार्थी म्हणून नव्हे, तर आपल्या कुटुंबातील सदस्याप्रमाणे पाहतात. त्यांना आधार देतात, मार्गदर्शन करतात आणि मायेची ऊब देतात.

माझ्यासारखे महाराष्ट्रातील अनेक जण त्यांना मोठ्या भावाचे स्थान देतात. आधुनिकतेच्या या युगातही अक्षयदादांनी आपल्या मातीतल्या संस्कृतीशी असलेली नाळ कधी तुटू दिली नाही. बैलपोळा, बैलगाडा शर्यत, शिखर शिंगणापूर कावड यात्रा, पंढरपूर वारी अशा परंपरांमध्ये त्यांचा दरवर्षीचा उत्साहाने सहभाग असतो. आधुनिक विचार आणि संस्कृतीचा अभिमान यांचा सुंदर संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसून येतो.

**"संपत्तीने श्रीमंत होणारे अनेक असतात; पण माणुसकीने श्रीमंत होणारे फार थोडे असतात. अक्षयदादा इंगळे हे त्यापैकीच एक!" अक्षयदादांना वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा! त्यांना निरोगी, दीर्घ आणि समाजसेवेने समृद्ध आयुष्य लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.**

## 'वनप्लस कॅम्पस डॉमिनेट २०२६'ची पुण्यातून सुरुवात

- १६ विद्यापीठांत ई-स्पोर्ट्स स्पर्धेची रंगणार मेजवानी




पुणे (दै. आरंभ पर्व)

जागतिक तंत्रज्ञान ब्रँड वनप्लसने देशभरातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात येणाऱ्या 'वनप्लस कॅम्पस डॉमिनेट २०२६' या ई-स्पोर्ट्स स्पर्धेच्या तिसऱ्या आवृत्तीची घोषणा केली आहे. सात शहरांतील १६ विद्यापीठांमध्ये होणाऱ्या या स्पर्धेची सुरुवात २९ जून रोजी पुण्यातून होणार असून, पुढील दोन महिन्यांत हैदराबाद, बेंगळुरू, जयपूर, चंदीगड, नवी दिल्ली आणि नोएडा येथेही सामने रंगणार आहेत. या स्पर्धेत देशभरातील एक लाखांहून अधिक विद्यार्थी आणि ५० पेक्षा जास्त गेमिंग क्रिएटर्स सहभागी होण्याची अपेक्षा आहे. 'वनप्लस गेमिंग ट्रक'च्या माध्यमातून प्रत्येक महाविद्यालयीन परिसरात दोन दिवसांसाठी अत्याधुनिक गेमिंग झोन उभारण्यात येणार आहे. यामध्ये स्पर्धात्मक सामने, नवीन उत्पादनांचा प्रत्यक्ष अनुभव, प्रसिद्ध गेमिंग क्रिएटर्सशी संवाद आणि विविध सहभागात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.












## थोडक्यात पण महत्वाचे



### आसनव्यवस्थेवरून खासदार-आमदारांचे नाराजीनाट्य

पुणे (आरंभ पर्व) : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यक्रमात पहिल्या रांगेत बसण्यावरून भाजपच्या राज्यसभा खासदार प्रा. मेधा कुलकर्णी व भाजप आमदार अभिमन्यू पवार यांच्यात शाब्दिक खडाजंगी झाली. दुखावलेल्या कुलकर्णी कार्यक्रमातून निघून गेल्या. 'हा कार्यक्रम मराठा समाजाचा आहे, तुम्ही पुढच्या रांगेतील खुर्चीवर बसलात तर वाद होईल', असे पवार म्हणाल्याचे कुलकर्णी म्हणाल्या, तर पवार यांनी हा आरोप फेटाळला. पुण्यातील गणेश कला व क्रीडा मंच येथे शुक्रवारी छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्थेच्या वतीने मुख्यमंत्र्यांच्या हस्ते विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रम सुरू होण्यास काही मिनिटांचा अवधी असताना खा. प्रा. मेधा कुलकर्णी मंचावर आल्या. अधिकाऱ्यांनी कुलकर्णी यांना पहिल्या रांगेत बसण्यास सांगितले. मात्र, भाजप आमदार अभिमन्यू पवार यांनी त्यांना पुढे बसण्यास मज्जाव केला. यावरून दोघांत वाद झाला.

### 'घरच्यांना दुखावण्यापेक्षा केतनला मारणे सोपे वाटले' : सिया गोयल

पुणे (आरंभ पर्व) : पुण्यातील प्रसिद्ध उद्योगपती केतन अगरवाल याच्या हत्येप्रकरणातील मुख्य आरोपी सिया गोयल हिने पोलीस कोठडीत गुन्ह्याची कबुली देताना अत्यंत धक्कादायक खुलासे केले आहेत. मला केतनसोबत लग्न करायचे नव्हते, पण हे घरात सांगण्याची हिंमत माझ्यात नव्हती. घरच्यांचा सामना करून लग्न मोडण्यापेक्षा केतनचा काटा काढणे मला जास्त सोपे वाटले, अशी धक्कादायक कबुली सियाने पुणे ग्रामीण पोलिसांना दिली आहे. पोलिसांनी केलेल्या चौकशीत सियाने आणखी एक अजब कारण सांगितले. केतन हा डोक्याला विग लावत असल्याने ती त्याचा तिरस्कार करत होती, असा दावा तिने केला. जेव्हा पोलिसांनी तिला विचारले की, जर तुला लग्न करायचे नव्हते, तर तू घरी का सांगितले नाहीस? यावर तिने, मला घरच्यांना दुखवायचे नव्हते. म्हणूनच लोहगड किल्ल्यावरून त्याला दरीत ढकलून अपघाताचा बनाव रचणे मला सोपे वाटले, असे उत्तर दिले. या दाव्यावर केतनचे वडील विशाल अगरवाल यांनी तीव्र संताप व्यक्त केला. त्यांनी सांगितले की, "माझा मुलगा छोटा हेअर पॅच वापरायचा ही गोष्ट खरी आहे. पण साखरपुड्यापूर्वीच आम्ही सिया आणि तिच्या कुटुंबीयांना याबाबत पूर्ण कल्पना दिली होती. केवळ विग लावतो म्हणून माझ्या मुलाची हत्या केली जाऊ शकत नाही, हा निव्वळ बनाव आहे."

### आळेफाटा बायपासवर कारच्या तब्बल ३ पलट्या; दोन चिमुकले सुखरूप

पुणे (आरंभ पर्व) : महामार्गावरील प्रवास कधी जीवघेणा ठरेल, याचा नेम नसतो. शुक्रवारी (दि. २६) दुपारी सुमारे १.३० वाजण्याच्या सुमारास आळेफाटा बायपासवर हृदयाचा ठोका चुकवणारा भीषण अपघात घडला. पुण्याच्या दिशेने कुटुंबासह प्रवास करणाऱ्या भरधाव कारवरील चालकाचे अचानक नियंत्रण सुटले. त्यानंतर कारने महामार्गावर २ ते ३ वेळा पलट्या घेतल्या आणि रस्त्यालगत असलेल्या एका घराच्या पडवीवर जाऊन जोरदार धडक दिली. अधिकच्या माहितीनुसार, अपघाताचा आवाज इतका प्रचंड होता की परिसरातील नागरिक घटनास्थळी धावत आले. कारची अवस्था पाहून आतमध्ये असलेल्या प्रवाशांचे काय झाले असेल, याची भीती सर्वांनाच वाटत होती. मात्र, स्थानिकांनी प्रसंगावधान राखत कारमधील जखमींना तातडीने बाहेर काढले. कारमधून दीड वर्षांचे बाळ आणि तीन वर्षांचा मुलगा बाहेर काढण्यात आला. अपघाताचा धक्का आणि आई-वडिलांची अवस्था पाहून दोन्ही मुले घाबरून रडू लागली. अशा वेळी स्थानिक नागरिकांनी माणुसकीचे दर्शन घडवत मुलांना चॉकलेट दिले, त्यांच्याशी प्रेमाने संवाद साधला आणि त्यांना शांत केले. या अपघातात तीन वर्षांचा मुलगा पूर्णपणे सुखरूप बचावला, तर दीड वर्षांच्या बाळाला किरकोळ दुखापत झाली.

# भारतीय विद्यार्थ्यांसाठी ब्रिटिश कौन्सिलचे प्री-डिपार्चर ब्रीफिंग

- १६ जुलै रोजी ऑनलाईन मार्गदर्शन सत्र
- व्हिसा, निवास, आरोग्य आणि विद्यार्थी जीवनाबाबत मिळणार तज्ज्ञांचे मार्गदर्शन




**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

यूकेमध्ये उच्च शिक्षणासाठी जाणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांना परदेशातील शैक्षणिक आणि दैनंदिन जीवनाशी सहज जुळवून घेता यावे, यासाठी ब्रिटिश कौन्सिलतर्फे 'स्टडी यूके प्री-डिपार्चर ब्रीफिंग' या विशेष ऑनलाईन मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. हे व्हर्च्युअल सत्र गुरुवार, १६ जुलै २०२६ रोजी दुपारी ३ ते सायंकाळी ५ (भारतीय प्रमाणवेळेनुसार) होणार असून, यूकेमधील विद्यापीठांकडून ऑटम/विंटर २०२६ सत्रासाठी प्रवेशपत्र मिळालेल्या विद्यार्थ्यांना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. यूकेमध्ये प्रथमच शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवासापूर्वी आवश्यक असलेल्या सर्व महत्त्वाच्या बाबींची माहिती या ब्रीफिंगमध्ये दिली जाणार आहे. व्हिसा प्रक्रिया, निवास व्यवस्था, प्रवासाचे नियोजन, आरोग्य सेवा, आर्थिक नियोजन, मानसिक आरोग्य, सुरक्षा आणि यूकेमधील विद्यार्थी जीवनाशी संबंधित अनेक महत्त्वाच्या विषयांवर तज्ज्ञ मार्गदर्शन करतील.

या कार्यक्रमात यूके व्हिसा अँड इमिग्रेशन (यूकेव्हीआय), ब्रिटिश युनिव्हर्सिटीज इंटरनॅशनल लायझन असोसिएशन (बीयूआयएलए) यांचे प्रतिनिधी, तसेच यूकेमधील माजी विद्यार्थी आणि सध्या शिक्षण घेत असलेले विद्यार्थी सहभागी होणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना थेट संवाद साधण्याची आणि त्यांच्या शंकांचे निरसन करून घेण्याची संधी मिळणार आहे. या मार्गदर्शन सत्रात विद्यार्थ्यांना यूकेमध्ये स्थलांतर करण्यापूर्वीची तयारी, आवश्यक कागदपत्रे, सोबत घ्यावयाच्या वस्तू, खर्चाचे नियोजन, तेथील जीवनशैलीशी जुळवून घेण्याचे मार्ग याबाबत माहिती दिली जाईल.

याशिवाय आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या आरोग्य सेवा, वैद्यकीय विमा, सुरक्षितता, आपत्कालीन सुविधा आणि मानसिक आरोग्यासाठी उपलब्ध सहाय्य यांची सविस्तर माहिती दिली जाईल.

यूके व्हिसा अँड इमिग्रेशनचे प्रतिनिधी विद्यार्थी व्हिसा अर्ज प्रक्रियेतील अद्ययावत नियम, आवश्यक कागदपत्रे आणि अर्ज करताना घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन करतील.

तसेच यूकेमध्ये शिक्षण पूर्ण केलेले माजी विद्यार्थी आणि सध्या तेथे शिक्षण घेत असलेले विद्यार्थी त्यांच्या अनुभवांमधून शिक्षण, दैनंदिन जीवन, सांस्कृतिक वातावरण, रोजगाराच्या संधी आणि आव्हानांबाबत उपयुक्त माहिती विद्यार्थ्यांसोबत शेअर करतील. ब्रिटिश कौन्सिलने विद्यार्थ्यांना या ब्रीफिंगसाठी 'स्टडी यूके' संकेतस्थळावर जाऊन नोंदणी करण्याचे आवाहन केले आहे. नोंदणी पूर्ण झाल्यानंतर सहभागी विद्यार्थ्यांना व्हर्च्युअल सत्रात सहभागी होण्यासाठी आवश्यक माहिती आणि लॉग-इन सूचना कार्यक्रमाच्या तारखेपूर्वी पाठविण्यात येतील. ब्रिटिश कौन्सिलच्या या उपक्रमामुळे यूकेमध्ये शिक्षणासाठी जाणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाने आणि योग्य तयारीनिशी नव्या शैक्षणिक प्रवासाची सुरुवात करण्यास मोठी मदत होणार आहे.

# भारतीयांसाठी वारसा नियोजन अधिक सुलभ

- बीकन ग्रुपचे 'वसीयत आफ्टर मी' व्यासपीठ आणि 'माय वेल्थ इन्फॉर्मेशन' ॲपचे अनावरण
- वसीयत तयार करण्यापासून सुरक्षित जतनापर्यंत सर्व सुविधा एकाच ठिकाणी; ट्रस्ट व्यवस्थापनासाठी 'बीकनएक्स'चीही उपलब्धता

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

भारतातील सूचीबद्ध विश्वस्त सेवा क्षेत्रातील अग्रगण्य संस्था बीकन ट्रस्टीशिप लिमिटेडच्या नेतृत्वाखालील बीकन ग्रुपने भारतीय कुटुंबांसाठी वारसा नियोजन अधिक सुलभ, सुरक्षित आणि पारदर्शक करण्याच्या उद्देशाने 'वसीयत आफ्टर मी' या नव्या व्यासपीठाची घोषणा केली आहे. यासोबतच नागरिकांना त्यांच्या मालमत्तेची माहिती डिजिटल स्वरूपात सुरक्षित ठेवता यावी यासाठी 'माय वेल्थ इन्फॉर्मेशन' हे अँड्रॉइड आणि आयओएसवरील मोबाईल ॲपही सादर करण्यात आले आहे. तसेच ट्रस्ट व्यवस्थापनासाठी 'बीकनएक्स' ही स्वतंत्र सेवा देखील उपलब्ध करून देण्यात आली आहे.

भारतातील मोठ्या प्रमाणावर नागरिकांकडे वैध वसीयत नसल्यामुळे वारसांमध्ये मालमत्तेवरून वाद, न्यायालयीन प्रक्रिया आणि कौटुंबिक मतभेद निर्माण होतात. ही समस्या लक्षात घेऊन बीकन ग्रुपने वसीयत तयार करण्यापासून तिची सुरक्षित नोंद, जतन आणि वेळोवेळी पुनरावलोकन करण्यापर्यंतची संपूर्ण सेवा एकाच छताखाली उपलब्ध करून दिली आहे.

'वसीयत आफ्टर मी'च्या माध्यमातून अनुभवी बँकिंग आणि विश्वस्त सेवा तज्ज्ञ नागरिकांना त्यांच्या इच्छेनुसार स्पष्ट, कायदेशीरदृष्ट्या सक्षम आणि भविष्यात वादाला वाव न देणारी वसीयत तयार करण्यासाठी मार्गदर्शन करतात. यामध्ये वसीयत तयार करणे, तिचे पुनरावलोकन, आवश्यक नोंदणी प्रक्रियेत मदत, स्वाक्षरी केलेली वसीयत सुरक्षित ठेवणे तसेच गुंतागुंतीच्या वारसा प्रकरणांसाठी कायदेतज्ज्ञांचा सल्ला यांचाही समावेश आहे.

डिजिटल सुविधांचा अधिकाधिक वापर लक्षात घेऊन 'माय वेल्थ इन्फॉर्मेशन' हे मोबाईल ॲप विकसित करण्यात आले आहे. या ॲपच्या माध्यमातून वापरकर्ते आपली मालमत्ता, आर्थिक गुंतवणूक, बँक खाती, स्थावर मालमत्ता आणि इतर महत्त्वाची माहिती सुरक्षितरीत्या नोंदवू शकतात. या माहितीच्या आधारे वसीयत तयार करण्याची प्रक्रिया अधिक सोपी आणि जलद होते. हे ॲप गुगल प्ले स्टोअर आणि ॲपल ॲप स्टोअरवर उपलब्ध आहे.

बीकन ट्रस्टीशिप लिमिटेडचे संस्थापक, अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक प्रताप सिंघठाणिया म्हणाले, "वारसा नियोजन हा केवळ श्रीमंतांसाठी नसून प्रत्येक कुटुंबासाठी अत्यंत आवश्यक विषय आहे.

## भारतातील रिअल इस्टेट क्षेत्रात ४,००० कोटी रुपयांच्या गुंतवणूक व्यासपीठाची घोषणा

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

भारतातील रिअल इस्टेट क्षेत्रात नव्या गुंतवणूक चक्राची चाहूल लागली असताना, अल्टरनेटिव्ह असेट मॅनेजमेंट क्षेत्रातील निसस फायनान्सने तब्बल ४,००० कोटी रुपयांच्या बहुविध रिअल इस्टेट गुंतवणूक व्यासपीठाची घोषणा केली आहे. उत्पन्न निर्माण करणाऱ्या तसेच मूल्यवृद्धीची क्षमता असलेल्या रिअल इस्टेट प्रकल्पांमध्ये गुंतवणूक करण्यासाठी तयार करण्यात आलेले हे देशातील पहिले बहुविध गुंतवणूक व्यासपीठ असल्याचा दावा कंपनीने केला आहे. या व्यासपीठाच्या माध्यमातून भारतातील उद्योजक, विकासक, तसेच संयुक्त अरब अमिराती (यूएई) येथील संस्थात्मक गुंतवणूकदार, फॅमिली ऑफिसेस आणि उच्च निव्वळ संपत्ती असलेल्या गुंतवणूकदारांना एकाच मंचावर आणण्यात येणार आहे. यामुळे भारतीय रिअल इस्टेट क्षेत्रात परदेशी भांडवलाचा ओघ वाढण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. कंपनीच्या या नव्या प्लॅटफॉर्ममध्ये 'निसस यिल्ड अँड असेट मल्टिप्लायर फंड (एनआयवायएएम)' या श्रेणी-दोन पर्यायी गुंतवणूक निधीचाही समावेश आहे. या माध्यमातून भूखंड विकास, जमिनीचे एकत्रीकरण, पुनर्विकास प्रकल्प, विशेष परिस्थितीतील मालमत्ता व्यवहार आणि कर्ज तसेच समभाग आधारित गुंतवणुकीवर भर दिला जाणार आहे.

## बीडच्या तहसीलदारावर माळेगाव पोलिसात ठाण्यात ॲट्रॉसिटीचा गुन्हा

**सांगवी (दै. आरंभ पर्व)**

जळगाव सुपे (ता. बारामती) येथील एका व्हॉट्सॲप ग्रुपवर ग्रामपंचायत आरक्षणासंदर्भात चालू असलेल्या चर्चेदरम्यान अनुसूचित जातीतील व्यक्तीला जातीय हेतूने अपमानित केल्याप्रकरणी तहसीलदारासह आणखी एका व्यक्तीवर माळेगाव पोलिस ठाण्यात ॲट्रॉसिटी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींमध्ये तहसीलदारांचा समावेश असून संदीप खोमणे हे बीड जिल्ह्यात तहसीलदार म्हणून कार्यरत आहेत. याप्रकरणी संदीप रमेश खंडाळे (वय ३६, रा. जळगाव सुपे, ता. बारामती) यांनी माळेगाव पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार आरोपी संदीप केशव खोमणे व सुनील दत्तू खोमणे (दोघे रा. जळगाव सुपे, ता. बारामती) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या दोघांची नावे आहेत. १९ एप्रिल २०२५ रोजी रात्री सव्वा नऊच्या सुमारास फिर्यादी आपल्या घरी असताना गावातील "आपला गाव आपला विकास" या व्हॉट्सॲप ग्रुपवर ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुकीतील आरक्षणासंदर्भात तहसीलदार, बारामती यांना पाठविण्यासाठी तयार केलेले पत्र शेअर केले होते. त्यानंतर ग्रुपवर सुरू झालेल्या चर्चेदरम्यान फिर्यादी हे अनुसूचित जातीचे असल्याची माहिती असूनही आरोपींनी त्यांना जातीय हेतूने अपमानित केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे.

## रोटरी क्लब ऑफ पुणे पाषाणचा पदग्रहण सोहळा उत्साहात संपन्न

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

रोटरी क्लब ऑफ पुणे पाषाणच्या रौप्यमहोत्सवी वर्षाची सुरुवात नव्या नेतृत्वाच्या पदग्रहण सोहळ्याने उत्साहात झाली. रोटरी वर्ष २०२६-२७ साठी रोटेरियन विनायक गुळवणी यांनी अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारली. त्यांच्यासह नव्या संचालक मंडळाचाही पदग्रहण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.



या सोहळ्याचे प्रमुख पाहुणे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर इलेक्ट (डीजीई) रोटेरियन चारू श्रोत्री यांच्या हस्ते अध्यक्ष व संचालक मंडळाचा पदग्रहण विधी संपन्न झाला. यावेळी त्यांनी नव्या नेतृत्वाचे अभिनंदन करत, रोटरीच्या "सर्व्हिस अबोव्ह सेल्फ" या ब्रीदवाक्यानुसार समाजहिताचे अधिकाधिक उपक्रम राबविण्याचा विश्वास व्यक्त केला.

सोहळ्याचे विशेष अतिथी, जीएसआर तथा माजी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर (पीडीजी) रोटेरियन रवी धोत्रे यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणातून रोटरीच्या मूल्यांची जपणूक करत समाजात दीर्घकालीन परिणाम घडवून आणणारे प्रकल्प हाती घेण्याचे आवाहन केले. त्यांनी रोटरी क्लब ऑफ पुणे पाषाणच्या उल्लेखनीय कार्याचे कौतुक करून नव्या कार्यकारिणीला शुभेच्छा दिल्या.


यावेळी निवृत्त अध्यक्ष रोटेरियन प्राजक्ता जेरे यांनी मागील वर्षातील विविध सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, पर्यावरण आणि समुदाय विकास क्षेत्रातील महत्त्वपूर्ण प्रकल्पांचा आढावा घेतला. तसेच क्लबचे सदस्य, देणगीदार, सहकार्य करणाऱ्या संस्था आणि हितचिंतक यांचे मनःपूर्वक आभार मानले.

नवनिर्वाचित अध्यक्ष रोटेरियन विनायक गुळवणी यांनी आपल्या मनोगतात आगामी वर्षासाठी क्लबची दिशा स्पष्ट केली. रोटरीच्या सातही फोकस एरियामध्ये प्रभावी प्रकल्प राबविणे, सदस्यांमधील स्नेह वृद्धिंगत करणे आणि समाजोपयोगी उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

या पदग्रहण सोहळ्यास रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ मधील अनेक पदाधिकारी, ए जी दीप्ती पुजारी, विविध रोटरी क्लबचे सदस्य, मान्यवर, कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मिथक की सत्य : बदामांमुळे शरीरात उष्णता वाढते का?

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



बदाम हे दीर्घकाळापासून दैनंदिन आहाराचा एक लोकप्रिय भाग राहिले आहेत, जे जेवणांमध्ये पौष्टिक घटक म्हणून आनंदाने खाल्ले जातात, नाश्त्याच्या दिनचर्येत समाविष्ट केले जातात किंवा गोड तसेच तिखट पदार्थांमध्ये जोडले जातात. त्यांच्या लोकप्रियतेनंतरही, विशेषतः उष्ण महिन्यांमध्ये, एक सामान्य समज पुन्हा पुन्हा पुढे येतो: बदामांमुळे शरीरात उष्णता वाढते का?

अनेक लोक उन्हाळ्यात बदाम खाण्याबाबत सावध होतात, कारण त्यांना असे वाटते की त्यामुळे शरीरातील उष्णता वाढू शकते किंवा गरम हवामानात अस्वस्थता निर्माण होऊ शकते. पण ही चिंता तथ्यांवर आधारित आहे का, की ती फक्त काळाच्या ओघात टिकून राहिलेल्या अनेक अन्नविषयक गैरसमजांपैकी एक आहे?

**समजून घेणे : धारणा (Perception)**

बदाम शरीरात उष्णता निर्माण करतात हा विश्वास अनेकदा अन्नपदार्थ कसे कार्य करतात यापेक्षा त्यांच्याबद्दल असलेल्या धारणांशी अधिक संबंधित असतो. बदाम पोषक तत्त्वांनी समृद्ध असून त्यामध्ये नैसर्गिकरीत्या आरोग्यदायी चरबी, प्रथिने आणि फायबर भरपूर प्रमाणात असते, त्यामुळे काही लोक त्यांना "जड" अन्न मानतात आणि त्यामुळे शरीरात उष्णता किंवा उबदारपणा जाणवू शकतो, असे गृहीत धरतात.

तथापि, उष्ण ऋतूंमध्ये बदामांचे सेवन करणे अयोग्य आहे, असे सूचित करणारा कोणताही पुरावा उपलब्ध नाही. उलट, संतुलित आहाराच्या सवयींचा भाग म्हणून विविध वयोगटांतील लोक आणि वेगवेगळ्या जीवनशैलीचा अवलंब करणारे लोक वर्षभर बदामांचा आनंदाने आस्वाद घेत राहतात. संतुलित पोषणविषयक दृष्टिकोनाचा एक भाग म्हणून, तज्ज्ञांकडून बदामांची मोठ्या प्रमाणावर शिफारस केली जाते. मॅक्स हेल्थकेअर – नवी दिल्ली येथील डायटेटिक्स विभागाच्या प्रादेशिक प्रमुख रितिका समद्दार स्पष्ट करतात, "आपण आपल्या सकाळीची सुरुवात ज्या पद्धतीने करतो, त्याचा आपल्या शरीराच्या दिवसभरातील कार्यक्षमतेवर सखोल परिणाम होतो. सातत्य आणि पोषणावर आधारित संतुलित दिनचर्या ऊर्जेची पातळी, पचनक्रिया तसेच दीर्घकालीन आरोग्यविषयक परिणामांपर्यंत अनेक बाबींवर प्रभाव टाकू शकते. दैनंदिन आहारात पोषक तत्त्वांनी समृद्ध सुपरफूड्सचा समावेश करणे ही मी माझ्या सर्व रुग्णांना देत असलेली शिफारस आहे, कारण एकूण आरोग्याला आधार देण्याचा हा सर्वात सोपा मार्गांपैकी एक आहे."

**दैनंदिन आरोग्यासाठी पोषक तत्त्वांनी समृद्ध सुपरफूड**

कॅलिफोर्निया बदामांमध्ये व्हिटॅमिन E, प्रथिने, फायबर, मॅग्नेशियम, रिबोफ्लेविन, फॉस्फरस आणि झिंक यांसह २४ पोषक तत्त्वे आढळतात, ज्यामुळे ते पोषक तत्त्वांनी समृद्ध असे सुपरफूड ठरतात आणि आधुनिक जीवनशैलीमध्ये त्यांचा सहजपणे समावेश करता येतो.

प्रथिने, आरोग्यदायी चरबी आणि फायबर यांचे मिश्रण स्थिर पोषण प्रदान करते आणि तृप्तीची भावना वाढविण्यास मदत करते, ज्यामुळे बदाम दिवसाच्या कोणत्याही वेळी समाधानकारक पर्याय ठरतात. ऊर्जा पातळीत अचानक वाढ आणि त्यानंतर घसरण होण्यास कारणीभूत ठरणाऱ्या अतिप्रक्रिया केलेल्या अन्नपदार्थांपेक्षा, बदाम सातत्यपूर्ण पोषण प्रदान करतात, जे कामाच्या व्यस्त वेळापत्रकात, प्रवासादरम्यान किंवा सक्रिय जीवनशैलीचा भाग म्हणून उपयुक्त ठरू शकते.

नियमित आहारात बदामांचा समावेश केल्याने मिळणाऱ्या पोषणविषयक फायद्यांवरही संशोधनातून प्रकाश टाकण्यात आला आहे. युरोपियन जर्नल ऑफ क्लिनिकल न्यूट्रिशनमध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासात असे आढळून आले की दररोज ४३ ग्रॅम कोरडे भाजलेले आणि हलके मीठ घातलेले बदाम खाल्ल्याने भूक कमी होण्यास मदत झाली आणि शरीराचे वजन न वाढवता व्हिटॅमिन E तसेच मोनोअनसॅच्युरेटेड ("चांगल्या") चरबींचे आहारातील सेवन सुधारले.

**बदाम भिजवून खाणे आवश्यक आहे का?**

बदामांशी संबंधित आणखी एक प्रश्न म्हणजे, विशेषतः उन्हाळ्यात, ते खाण्यापूर्वी भिजवून ठेवावेत का? अनेकांना भिजवलेले बदाम आवडतात, कारण ते अधिक मऊ होतात आणि चावायला सोपे असतात. तथापि, बदाम भिजवणे ही प्रामुख्याने त्यांच्या पोताशी (टेक्स्चर) आणि वैयक्तिक पसंतीशी संबंधित बाब आहे, पोषणविषयक गरज नाही. बदाम भिजवून खाल्ले किंवा न भिजवता खाल्ले, तरीही ते संतुलित आहारात योगदान देणारी समान मौल्यवान पोषक तत्त्वे प्रदान करत राहतात.

**दैनंदिन आरोग्याला आधार**

बहुउपयोगितेच्या पलीकडे जाऊन, बदाम अनेक पोषणविषयक फायदे प्रदान करतात. बदाम हे प्रथिनांचे एक स्रोत आहेत, जे सामान्य हाडांच्या देखभालीस हातभार लावतात, स्नायूंच्या वस्तुमानाच्या वाढीस आणि देखभालीस समर्थन देतात तसेच मुलांमध्ये हाडांच्या सामान्य वाढ आणि विकासासाठी आवश्यक असतात.

बदामांमध्ये आढळणारे आणखी एक महत्त्वाचे पोषक तत्त्व म्हणजे मॅग्नेशियम, जे स्नायू आणि मज्जासंस्थेच्या सामान्य कार्यात योगदान देते, त्यामुळे आरोग्यकेंद्रित जीवनशैलीचा अवलंब करणाऱ्यांसाठी बदाम हा एक उपयुक्त पर्याय ठरतो. पोषक तत्त्वांची समृद्धता आणि सोयीस्करपणा यांचा संगम असल्यामुळे, बदामांचा नाश्त्यामध्ये, व्यायामानंतर किंवा सणासुदीच्या तसेच कौटुंबिक जेवणाचा एक भाग म्हणूनही आनंद घेता येतो.

बदामांमुळे शरीरात उष्णता वाढते ही धारणा, विशेषतः उष्ण महिन्यांमध्ये, अन्नपदार्थांबाबत प्रचलित असलेली एक सामान्य समज आहे. तथापि, बदाम हे पोषक तत्त्वांनी समृद्ध अन्न असून, संतुलित जीवनशैलीचा एक भाग म्हणून त्यांचा वर्षभर आनंद घेता येऊ शकतो.

> बदाम "गरम" आहेत की "थंड" यावर लक्ष केंद्रित करण्याऐवजी, ते दैनंदिन आहाराच्या सवयींमध्ये कोणते एकूण पोषणमूल्य आणतात याचा विचार करणे अधिक उपयुक्त ठरू शकते. प्रथिने, फायबर, आरोग्यदायी चरबी, व्हिटॅमिन E आणि मॅग्नेशियमने समृद्ध असलेले कॅलिफोर्निया बदाम तृप्ती, सोयीस्करपणा आणि दैनंदिन आरोग्याला समर्थन देणारे सकस पोषण प्रदान करतात. विविधतेने युक्त आहाराचा भाग म्हणून मर्यादित प्रमाणात त्यांचा आस्वाद घेतल्यास, मोजके कॅलिफोर्निया बदाम कोणत्याही ऋतूमध्ये दैनंदिन दिनचर्येत एक साधी आणि समाधानकारक भर ठरू शकतात.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.